# महाराष्ट्र विधानसभा
## पहिले अधिवेशन, २०२५
## सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या
## माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी
## सोमवार, दिनांक १७ मार्च, २०२५
## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
## कपात सूचनांची एकूण संख्या - १४

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: ई-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०२, सर्वसाधारण शिक्षण**<br>**रूपये:- ८,३१,१३,६२,११,०००/-**<br>**श्री. हारुन खान** |
| (१) | २२६ | १०० | राज्यातील बालकांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियमांतर्गत विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व पुस्तक देण्यात येत असतांना चालू शैक्षणिक वर्षामध्ये वर्सोवा विधानसभा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके अद्यापही न मिळणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (२) | २९२ | १०० | पालघर जिल्हातील डहाणू व तलासरी तालुक्यात शहरी व ग्रामीण भागातील शाळांच्या इमारती ह्या जीर्ण अवस्थेत असणे, या शाळांमध्ये सोय - सुविधा उपलब्ध नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (३) | १७७ | १०० | सोलापूर जिल्हा परिषदेची एकमेव विदयालय माढा येथे असून याठिकाणी मोठया प्रमाणात शिक्षकांच्या जागा रिक्त असणे, विभागीय आयुक्तांच्या परवानगीमुळे रिक्त जागा अदयापी भरण्यात न येणे, गेली अनेक वर्षे शिक्षकांच्या जागा भरण्यात आलेल्या नसणे, रिक्त जागांचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्याकरिता मराठवाडा क्षेत्रात जिल्हा परिषदेची अनेक हायस्कूल आहेत त्या शिक्षकांच्या व जिल्हा परिषद माढा येथील शिक्षकांच्या आपसात सेवामर्ज बदल्या करण्यास मान्यता देण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (४) | १७८ | १०० | सोलापूर जिल्हयात एकमेव असणारी जिल्हा परिषद शाळा माढा येथील सर्व खोल्यांचे स्ट्रक्चरल ऑडीट झाले असून सदरील रिपोर्ट नुसार १२ वर्गखोल्या धोकादायक ठरल्या असणे, त्यामुळे सदर ठिकाणी जिल्हा परिषद शाळेतील सर्वच खोल्यांचे पुन्हा सर्वेक्षण करुन त्या ठिकाणी सर्वाच्या सर्व वर्गखोल्या हया नवीन स्वरुपात बांधकाम करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५) | २२५ | १० | राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी निमशासकीय व अनुदानित संस्थामध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असणे, मात्र त्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळत नसणे, संस्थेला सन २००५ पुर्वी टप्पा अनुदान मिळाले असणे, आणि सन २०१० पूर्वी १०० टक्के अनुदान प्राप्त झाले असणे असे २६,९०० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असणे, राज्यात समग्र शिक्षा योजनेतंर्गत सन २००६ पासून कंत्राटी तत्वावर जिल्हा समन्वयक, गट स्तरावर विषयतज्ञ, केंद्र स्तरावर दिव्यांग एकात्मिक शिक्षण योजनेतंर्गत प्राथमिक स्तरावरील शिक्षण माध्यमिक स्तरावरील शिक्षक असे ३१०५ कार्यरत असणे, तथापि त्यांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळत नसणे याबाबत शिक्षकांनी शासनाकडे वारंवार मागणी केली असणे, आंदोलने, निदर्शने केली असणे मात्र शासनाने जुन्या पेन्शन योजनेचा लाभ दिले नसणे, जुन्या पेन्शन योजनेचा लाभ देण्यासंदर्भात शिक्षण आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली शासनाने समिती नेमली असणे, समितीने आपला अहवाल व शिफारशी शासनास सादर केल्या नसणे, तातडीने अहवाल सादर करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | २२९ | १० | प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील शालेय पोषण आहारासाठी स्वयंपाकी तथा मदतनीसांना ९ कोटी १४ लाख ७८ हजार ४०० रुपये तसेच राज्य सरकारकडून - २८ कोटी ९६ लाख ८१ हजार ६०० रुपये असे एकूण ११३ कोटी ४७ लाख रूपये वर्ग करण्यात आले असल्याचे दि. ४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारस निदर्शनास येणे, शासकीय खाजगी अनुदानीत अशंता अनुदानीत शाळांमधील पहिली ते आठवीतील विद्यार्थ्यांसाठी मध्यान्ह भोजन ३५ जिल्हानिहाय पोषण आहार शिजविण्यासाठी सुमारे १,५२,५४४ |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शाळास्तरावर स्वयंपाकी, मदतनीस यांना विद्यार्थी संख्यानुसार प्रति लाभार्थी आठ रुपये याप्रमाणे दरमहा ६०० रूपये तर राज्य सरकार कडून १९०० असे प्रतिमहा २५०० रुपये मानधन वर्षातून १० महिन्यानी दिले जाणे, वाढत्या महागाईच्या तुलनेत दिले जाणारे मानधन हे अत्यल्प असल्याने त्यांना घरखर्च चालविणे अवघड होणे, त्यातच माहे जुलै, २०२४ पासून मदतनीसानचे सहा महिन्यांचे मानधन दिले नसल्याने त्यांची गैरसोय होऊन मुलांचे पोट भरणाऱ्या कुटुंबावर उपाशी राहण्याची वेळ येणे, शासनाने मानधनात वाढ करून ते वेळेत अदा करण्याची मागणी सामाजिक संस्था कडून केली जात असूनही होत असलेल्या विलंबामुळे पसरलेली तीव्र नाराजी याप्रकरणी तात्काळ दखल घेण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (७) | २३३ | १० | राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या दप्तरातून पाटी-पेन्सिल हद्दपार करून वही आणि पेन चा वापर करून अध्ययन करावे लागणे, नव्या तंत्रज्ञानाची जोड विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अमुलाग्र बदल झालेले असणे, पाटीची जागा मोबाईलच्या की पॅडने व वहीने घेण्यात येऊन नव्या तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात ऑनलाईन शिक्षणाला शिक्षण विभागाकडून देण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ त्यासुमारास दिसून येत असणे, परिणामी विद्यार्थ्यांच्या पालकांना वह्या, पेन व इतर स्टेशनरी खरेदी कराव्या लागत विद्यार्थ्यांच्या पालकांना शिक्षणाच्या खर्चात वाढ होणे, राज्यातील विशेषतः ग्रामीण खेड्यातील गोर-गरीब विद्यार्थ्यांच्या पालकांना हा खर्च करण्यास अवघड जाणे, यापूर्वी पाटीची ओळख दगडी पाटीने त्यानंतर जाड पुठ्ठा किंवा कार्ड बोर्ड काळा रंग देऊन त्याच्या पाट्या बाजारात आल्यानंतर अंक गणिताची ओळख व्हावी यासाठी शाळेत मनी पाट्यांमुळेच प्रत्येक विद्यार्थ्याचा श्री गणेशा पाटी पेन्सिलने सुरू झालेला असणे, शिक्षणाची सुरुवात शाळेचा पहिला दिवस म्हणजे पाटी आणि पेन्सिलने जोडले जाणारे नाते हे समीकरण काळाच्या ओघात बदलत इतिहासात जमा होणे, त्यामुळे शैक्षणिक जीवनामध्ये पाटी-पेन्सिलचे महत्व अनन्यसाधारण शिक्षण पद्धती बदलल्याने सर्वसाधारण उद्योग-धंदा करणारे कुटुंबाचे उदरनिर्वाहाचे साधन घटल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊ नये, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | २४९ | १० | मदरसा, मालवणी, मालाड (प.) मुंबई येथे अनेक मदरसे असणे, सदरच्या मदरशांना अनुदान मिळत नसणे, मदरशांचा दर्जा सुधारण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, राज्य सरकारने दर्जा सुधारण्यासाठी वाढीव अनुदान देण्याची गरज निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | परिणामी मदरशांमधील विद्यार्थी व पालक यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ३०९ | १० | मोजे मालवणी, मालाड (पश्चिम), मुंबई न,भू.क्र.३५२५ (भाग), स.न.२६३ (भाग) येथील जागतिक बँक प्रकल्प योजनेमध्ये नियोजनात्मक तरतुदीनुसार प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व कनिष्ठ विद्यालययाकरिता राखीव भूखंड असणे, तसेच शैक्षणिक सुविधे करिता दोन प्राथमिक शाळा व तीन संयुक्त शाळांकरिता भूखंड आरक्षित असणे, मालवणी परिसर झोपडपट्टी युक्त असणे या भागात गरीब कुटुंबे राहतात त्यांच्यासाठी आदर्श शाळा तसेच महिलांसाठी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: ई-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२०४, क्रीडा व युवक सेवा**<br>**रूपये:- ७,१२,०३,६४,०००/-**<br>**श्री. राजु खरे** |
| (१०) | २२३ | १०० | महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा धोरण अंतर्गत तालुका क्रीडा संकुल मोहोळ जिल्हा सोलापूर येथे तालुका क्रीडा संकुलाचे काम प्रगतीपथावर असून त्यामधून विविध क्रीडा विषयक सुविधांची निर्मिती करण्यात येत आहे तालुका क्रीडा संकुल मोहोळकरिता यापूर्वी रक्कम रुपये दोन कोटी निधी प्राप्त झाला असून त्यामधून विविध सुविधांची निर्मिती करण्यात येणार आहे संदर्भ की शासन निर्णयामुळे तालुका क्रीडा संकुल मोहोळ साठी निधी वितरित करणे आवश्यक आहे तरी निधी त्वरित तालुका क्रीडा संकुल मोहोळ साठी आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तरतूद करून निधी उपलब्ध करून देण्यात यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (११) | ३०७ | १०० | पालघर जिल्ह्यातील डहाणू व तलासरी तालुक्यातील शालेय युवकांना क्रीडा विषयक सुविधा उपलब्ध नसणे, दर्जेदार क्रीडा संकुले उभारण्याची आवश्यकता असणे, क्रीडा संकुलांमध्ये दर्जेदार सोयी सुविधा उपलब्ध करणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (१२) | २४० | १०० | अंजनगाव सुर्जी येथील क्रीडा संकुल नसल्याने अंजनगाव सुर्जी येथे क्रीडा संकुल उभारण्याकरिता सन २०२१ मध्ये तत्कालीन मा. क्रीडा व युवक कल्याण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली २३/ ६/ २०२१ रोजी बैठक पार पडली होती. या बैठकीत दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने जिल्हा अधीक्षक, कृषी विभाग, अमरावती,जिल्हा क्रीडा अधिकारी, अमरावती व उपविभागीय कृषी अधिकारी, अचलपूर यांनी दिनांक २४/ ६/ २०२१ रोजी अंजनगाव सुर्जी तालुका क्रीडा संकुलसाठी नगरपरिषदेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्रमांक २१ नुसार आरक्षित करण्यात आलेली नियोजित जागा मौजे खेल हागोणे येथील सर्वे नंबर ५ क्षेत्र १.४ हेक्टर जागेची प्रत्यक्ष पाहणी करून सदर जागा क्रीडा संकुलसाठी योग्य असल्याबाबत अहवाल विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती यांच्याकडे पाठवण्यात आला होता. सदर अहवालाला चार वर्षाहून अधिकचा कालावधी उलटून ही अद्याप पर्यंत याबाबत कोणतीही निर्णयात्मक कारवाई करण्यात आलेली नाही. अंजनगाव सुर्जी मधील बहुतांश तरुण-तरुणी पोलीस व आर्मी भरतीचे प्रॅक्टिस करत आहेत. त्याचबरोबर विविध खेळाचे देखील सराव करत असतात. सराव करण्याकरता सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज असे क्रीडा संकुल उपलब्ध नसल्याने ही मुले रस्त्यावर धावण्याचा सराव करतात त्यामुळे रस्त्यावर धावताना अनेकदा अपघात देखील घडले आहेत. पोलीस व आर्मी भरती सारख्या स्पर्धा परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या तरुण-तरुणीसाठी तसेच क्रीडाप्रेमी साठी सर्व सोयी सुविधांनी सुसज्ज असे क्रीडा संकुल उभारण्याबाबत, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: ई-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२०२, शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च**<br>**रूपये:- १,९१,००,०१,०००/-**<br>**श्री. बाबासाहेब देशमुख** |
| (१३) | १८६ | १० | राज्यातील बहुतांश ग्रामीण भागातील शाळांमध्ये वीज, पाणी, स्वच्छता या मुलभूत सुविधांचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यात अडचणी येतात आणि शिकण्याच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. त्याच प्रमाणे ग्रामीण 'भागातील शाळांमध्ये अद्ययावत शैक्षणिक साधने, पुस्तक, संगणक आणि इंटरनेटची सुविधा उपलब्धता मर्यादित असते. त्यामुळे विद्धर्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणापासून वंचित राहावे लागेत. अनेकदा ग्रामीण शाळामध्ये शिक्षकांची संख्या पुरेशी नसते किंवा प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता यामुळे ग्रामीण |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | भागातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहात आहेत. सबब ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. नानाभाऊ पटोले** |
| (१४) | २७३ | १० | भंडारा जिल्हयात साकोली व लाखांदूर तालुक्यातील जिल्हा परिषद, प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांना पुरेशा प्रमाणात वर्गखोल्या उपलब्ध नसणे, संगणक (डिलीटल वर्गखोल्या) उपलब्ध नसणे, साकोली, लाखांदूर व तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळेच्या इमारती हया जिर्णावस्थेत असणे, पुरेशा प्रमाणात शिक्षकांची कमतरता असणे, त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, तसेच शालेय पोषण आहार उत्तम दर्जेचा नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना, |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १३ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई